# Avishkar-2017



## जैन महाविद्यालयात 'संशोधन-आविष्कार-२०१७'

वाघोली : विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची चळवळ रुजविण्यासाठी महाविद्यालयांनी प्रयत्न करावेत, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी व्यक्त केले.

भारतीय जैन संघटना महाविद्यालयात आयोजित 'संशोधन आविष्कार २०१७' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी डॉ. रवींद्र जायभाये, डॉ. मोहन वामन, विकास अधिकारी सी. आय. कोचर, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा उपस्थित होते. डॉ. उमरानी पुढे म्हणाले, की विद्यार्थ्यांमध्ये जिद्द, ध्येय, चिकाटी, वाचन हे गुण असल्यास ते उत्तम संशोधक होतील. अनेक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड असते, मात्र काही परिस्थितीमुळे त्याकडे वळता येत नाही. त्यांना प्रोत्साहित केल्यास ते संशोधनाकडे वळतील. संशोधक वाढल्यास देशाचा उत्तम विकास होईल. डॉ. के. सी. मोहिते म्हणाले, की शिक्षण संशोधनाबाबत कास धरणारे देश उच्च स्थानावर आहेत. डॉ. बाबासाहेब सांगळे म्हणाले, की उच्च शिक्षणामध्ये संशोधनाला अधिक वाव असल्याने विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळावे. 'आविष्कार २०१७' मध्ये जिल्हा विभागीय स्तरावर घेण्यात आलेल्या पोस्टर स्पर्धेत ११० स्पर्धकांनी भाग घेतला. त्यातील ३० स्पर्धक विजेते झाले. डॉ. रूपाली गुलालकरी यांनी प्रास्ताविक, तर डॉ. माधुरी देशमुख व डॉ. सहदेव चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. भूषण फडतरे यांनी आभार मानले.



वाघोली : भारतीय जैन संघटना महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी

## Photo Gallery





BJS
Arts, Science & Commerce, College, Wagholi, Pune
Zonal Level Research Project
Poster Competition
Fine Arts, Pure Science & Agirculture,
Animal Husbandry
Dr. Babasaheb Sangale
Principal
BJS




Savitribai Phule Pune University
Poster Competiti
Animal Husbandry


BJS
Dr. N. S. Umrani






Vacuum Cleaner


BJS
ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE
y and
rce, College, Wagholi, Pune
h Project

